बँक-पुनर् - भांडवलीकरणाचे आरबीआय स्वागत करीत आहे.

स्थिर अशा आर्थिक वृध्दीसाठी, चांगले भांडवलीकरण असलेली बँकिंग प्रणाली, आणि सर्वसाधारणतःच वित्तीय मध्यस्थता (इंटरमिडिएशन) प्रणाली अस्तित्वात असणे ही पूर्वावश्यकता आहे. आर्थिक इतिहासाने वारंवार निर्देशित केले आहे की, केवळ सशक्त/निरोगी कंपन्या व कर्जदारांना कर्ज देणा-या सशक्त बँकांमुळे गुंतवणुक व रोजगार निर्माणाचे चक्र निर्माण होत असते. बँकिंग प्रणालीचे स्वास्थ्य पूर्ववत करण्यासाठी भारत सरकारने दिलेले हे पॅकेज, भारतीय रिझर्व बँकेच्या (आरबीआय) दृष्टीकोनातून, ह्या देशाच्या आर्थिक भविष्याचे संरक्षण करण्यासाठी पुढे टाकलेले एक महत्वाचे पाऊलच आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये प्रथमच, बँकिंग क्षेत्रासमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी, तुकड्या-तुकड्याने डावपेच देण्याऐवजी, संपूर्ण जिग सॉ पझलचे सर्व धोरणात्मक तुकडे एकाच वेळी दिले जाऊन एक सर्वसमावेशक व सुसंगत धोरण तयार करण्याची एक संधीच आता आम्हाला मिळाली आहे. आम्ही आता खात्रीने सांगू शकतो की, इतर आघाड्यांवरील अर्थकारणासाठीच्या सशक्त मॅक्रो इकॉनॉमिक परिस्थितीच्या काळातच हे पाऊल उचलण्यात आले आहे.

बँकिंग क्षेत्रासाठीच्या प्रायोजित पुनर् भांडवलीकरण पॅकेजमध्ये अनेक लक्षणांचा/बाबींचा संयोग करण्यात आला आहे. प्रथम म्हणजे, पुनर्-भांडवलीकरण रोखे देऊन, भांडवलाच्या स्वरुपात इंजेक्शने देण्यात येतील व त्याच वेळी काही कालावधीत, अटेंडंट आर्थिक समस्या पुढे ढकलल्या जातील. त्यामुळे, व्याजाचा खर्च सोडल्यास (जे वार्षिक आर्थिक तुटीमध्ये समाविष्ट केला जाईल), पुनर्-भांडवलीकरण रोखे सरकारसाठी तरलता-उदासीन (लिक्विडिटी न्युट्रल) असतील. दुसरे म्हणजे, भांडवली आवश्यकतांचा काही भाग मार्केट फंडिंग मधून भागवला जाण्याच्या आवश्यकतेमुळे, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या खाजगी भागधारकांनाही ह्यात सहभागी व्हावे लागेल. आणि शेवटचे म्हणजे, ताळेबंदांमधील प्रश्न/समस्यांची चांगली सोडवणुक करणा-या आणि तातडीने कर्ज-निर्माण करण्यासाठी ताजे/नवे इंजेक्शनचा उपयोग करु शकणा-या बँकांना, ह्यामुळे एक अलिखित (कॅलिब्रेटेड) दृष्टिकोन मिळून, प्राधान्य दिले जाईल, तर इतर बँका तशा स्थितीत येण्याचा प्रयत्न करतील. मागील पुनर्-भांडवलीकरण कार्यक्रमांच्या तुलनेत, ही योजना, सार्वजनिक पुनर्-भांडवलीकरण कार्यक्रमात एक मार्केट शिस्त आणण्याचा एक चांगला मार्ग उपलब्ध करील.

वित्तीय क्षेत्रातील धोरणांनी वित्तीय स्थिरता ठेवूनही विकास साधला पाहिजे. विद्यमान असलेल्या कॉर्पोरेट स्ट्रेसवर उपाय देणा-या, नादारी व दिवाळखोरी संहितेची अंमलबजावणी करुन सुरुवात करणा-या, व परिणामी काल घोषित केलेल्या सार्वजनिक बँका - पुनर्-भांडवलीकरण कार्यक्रमात परिवर्तित झालेल्या सरकारच्या ह्या धाडसी पाऊलांचे, भारतीय रिझर्व बँकेच्या वतीने मी स्वागत करतो. अधिक विस्तृत अशा भारतीय अर्थव्यवस्थेच्या लाभासाठी, ह्या योजना त्यांची उद्दिष्टे साध्य करतील ह्याची खात्री करण्यासाठी, आरबीआय सरकारबरोबर काम करण्याची उमेद बाळगून आहे.

(उर्जित आर पटेल)
गव्हर्नर